# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २३ ऑक्टोबर २०२२

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६२५/२०२२ भादंविसक ४५२,३३६,२८६,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/१०/२०२२ रोजी २०.३० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २२/१०/२०२२ रोजी ०१.४१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | किरण औदुंबर शिवशेट्टी, वय- २७ वर्षे, रा. मु.पो. केगाव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अमर विश्वनाथ बसवंती, वय- ३२ वर्षे, २) गणेश विश्वनाथ बसवंती, वय- ३५ वर्षे, रा. केगाव, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीची पत्नी असे घरी असताना, यातील फिर्यादीचा भाऊ स्वप्नील याने दिलेल्या तक्रारी अर्ज मागे घ्यावे या कारणाकरीता यातील वरील आरोपीतांनी फिर्यादीच्या घरात फिर्यादीस दुखापत इजा करण्याच्या उद्देशाने बळजबरीने घुसुन त्याचे हातातील फटाक्याची माळ फिर्यादीच्या जिवीतास धोका निर्माण व्हावा या उद्देशाने घरात पेटवून तसेच फिर्यादीस धमकी देवून निघुन गेला आहे म्हणून. तपास:- पोना/ ११८६ घुगे |

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६२६/२०२२ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/१०/२०२२ रोजी ११.५५ वा ते १२.०५ वा चे सुमारास, एस टी स्टॅन्ड, सोलापूर, |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २२/१०/२०२२ रोजी २२.३६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अश्विनी गोपाळ पाटील, वय- ३४ वर्षे, रा. गणेश नगर, हैद्राबाद रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १) २८,०००/- रु ५ ग्रॅम सोन्याची अंगठी २ नग<br>२) ५२,५००/- रु ३४ ग्रॅम सोन्याचे गंठण<br>३) ४१,०००/- रु १५ ग्रॅम सोन्याची अंगठी<br>४) २,०००/- रु एक ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी<br>५) ५,०००/- रु २.५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी<br>६) ६,०००/- रु ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे लॉकेट<br>७) ५,२००/- रु ३.३ग्रॅम वजनाचे सोन्याचे सोन्याचे कानातील वेल<br>८) १,५००/- रु ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप्स<br>९) २०,०००/- रु ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुमके<br>१०) ८,०००/- रु ४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुमके<br>११) ७,०००/- रु ३.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे ठुशी<br>१२) ६,०००/- रु रोख रक्कम<br>एकुण- १,८२,२००/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या सोलापूर एस टी स्टॅन्ड येथुन फिर्यादीच्या पर्समध्ये लहान पाकिट त्यामध्ये वरील वर्णनाचा ऐवज व रोख रक्कम ठेवले होते. सदरचे पाकीट हे प्लास्टिक कॅरीबॅगमध्ये ठेवून त्या कॅरीबॅगला गाठ मारली व सदरची कॅरीबॅग पर्समध्ये ठेवली होती. फिर्यादी या बोरीवली उमरगा गाडीत प्लॅटफार्म क्रं. ०२ वरुन |

| | | |
|---|---|---|
| | | एस टी मध्ये चढत असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने लोकांच्या गर्दीचा फायदा घेवून मुद्दाम लबाडीने, फिर्यादीच्या संमतीवाचून पर्सची चैन काढुन, फिर्यादीने पर्स मध्ये ठेवलेली कॅरीबॅग व वरील ऐवज असलेले पाकीट चोरुन नेले आहे म्हणून. तपासः- सपोनि/ दांडगे - |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ५२९/२०२२ भादंविसक ३२४,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ११/१०/२०२२ रोजी १९.३० वा चे सुमारास, दावत चौक येथील मैदानात, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि. २२/१०/२०२२ रोजी २३.१५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | यलप्पा चंद्रशेखर कट्टीमणी, वय- २८ वर्षे, रा. झोपडपट्टी नं. ०१, नुराणी मस्जिद शेजारी, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) आकाश बलरामवाले, २) सचिन पंचु राजबिंदले, दोघे रा. झोपडपट्टी नं. ०१, नुराणी मस्जिद शेजारी, विजापूर रोड, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे रेणुका नगर येथिल बांधकाम संपवुन, फिर्यादी, रवी बेळेकर व संजु गायकवाड असे मिळून वरील ठिकाणी पाणीपुरी खाण्यासाठी आले असता, वरील आरोपीतांनी मिळुन मागील भांडणाचा राग मनात धरुन, फिर्यादीस शिवीगाळ करुन धमकी देवून चाकुने फिर्यादीच्या पोटावर व उजव्या व डाव्या बाजुस तसेच फिर्यादीच्या पाठीमागील बाजुस मारुन जखमी केले आहे म्हणून. तपासः- पोना/ १०४२ सोनार |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ५२८/२०२२ भादंविसक ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०६/१२/२०१४ रोजी ते दि. २३/०७/२०२२ रोजी पर्यंतचे दरम्यान, फिर्यादीचे सासरी, |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि. २२/१०/२०२२ रोजी १९.५६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | स्मिता सदानंद मोरे, वय- ३२ वर्षे, रा. ७७, चंदन नगर, जुळे सोलापूर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) सदानंद मोरे- पती, २) भारत गणपत मोरे- सासरे, दोघे रा. एफ/४०४, जिनी अपार्टमेंट, मगरपट्टा, पुणे, ३) स्वाती संजय पाटील- नणंद, रा. ३१०८, सगरम ब्लॉक ई नांदेड सिटी, पुणे, ४) दत्तात्रय मोरे- दिर, रा. १४२०, मंगळवार पेठ, उत्तरेश्वर मंदिराशेजारी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी संगनमत करुन, क्लिनीक टाकायचे आहे व घेतलेल्या घराचे कर्ज फेडण्यासाठी वारंवार वडिलांकडुन पेसे आण असे म्हणून किरकोळ कारणावरुन संशय घेवून हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केली व मला सन्यास घ्यायचा आहे तु लवकरात लवकर घटस्फोट दे असे म्हणत वारंवार मानसिक व शारिरीक त्रास दिला आहे. फिर्यादीच्या लग्नात वरदक्षणा म्हणून दिलेले अठरा तोळे सोने, मुलाचे बारशाचे वेळेस मिळालेले सोने व सणाचे वेळेस फिर्यादीच्या घरच्यांनी आरोपीत क्रं १ यास दिलेले नऊ तोळे सोने असे मिळुन सत्ताविस तोळे सोने फिर्यादीस परत न करता तिस माहेरी आणुन सोडले आहे. तसेच आरोपीत क्रं. २ यांनी घरातील काम व पैशांचे कारणावरुन सतत टोमणे देत शिव्या देवून मारहाण केली आहे. तसेच आरोपीत क्रं. ३ हिने घरातील कामाचे कारणावरुन टोमणे देत व फिर्यादीच्या विरोधात आरोपीत क्रं. १ यास उसकवुन फिर्यादीस मानसिक व शारिरीक त्रास देवून क्रुर वागणुक दिली आहे म्हणून. तपासः- मसफौ/ काळे |